महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र ९५ दिनांक- १३/०४/२०२१

## महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला ७०,४८,८००/- रुपयांचा गुटखा मध्यवर्ती गुन्हे शाखा व सायबर सेल यांचेकडुन संयुक्त कारवाई करुन जप्त.

दिनांक १३/०४/२०२१ रोजी सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी सपोनि/श्री.प्रविण स्वामी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन अशी बातमी मिळाली की, लॉकडाऊनमध्ये आरएमडी व रजनीगंधा महागडा गुटखा विकणेकामी गुजरात येथुन आयशर टेम्पो क्र.एम.एच ४८ जी.ई. ४१९४ येणार आहे.

सदर बातमीवरुन वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली, मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.जितेंद्र वनकोटी यांनी मध्यवर्ती गुन्हे शाखा व सायबर क्राईम सेलच्या कर्मचा-यांना घेवुन तात्काळ फाऊंटेन हॉटेल चौक ते दिल्ली दरबार हॉटेल काशिमीरा दरम्यान सापळा रचुन पाठलाग करुन वरील आयशर टेम्पो क्र.एम.एच ४८ जीई ४१९४ मधील वेस्टन हायवे ,साई पॅलेस हॉटेल समोर अडवुन,सदर टेंम्पोसह महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, पानमसाला,तंबाखु असा एकुण ७०,४८,८००/- रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला असुन एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबत काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई चालु आहे.

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील पोलीस उपायुक्त(गुन्हे), मा.श्री.रामचंद्र देशमुख,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.जितेंद्र वनकोटी,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती गुन्हे शाखा, श्री.प्रविण स्वामी, सहा.पोलीस निरीक्षक,सायबर क्राईम सेल,पोशि/२०७२ गणेश ईलग, पोशि/१८१२ प्रविण आव्हाड,नेम- सायबर गुन्हे शाखा, सहा.पोलीस उपनिरीक्षक/ महादेव वेदपाठक, पोहवा/३६ संदिप शिंदे, पोशि/३३७५ राजेश श्रीवास्तव, पोशि/३५०२ सतिष जगताप,पोशि/१८६८ महेश वेल्हे, सर्व नेमणूक- मध्यवर्ती गुन्हे शाखा यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाणे करीत आहेत.

Scanned with CamScanner